# कृषी विद्यापीठातील पदवी प्रवेशाकरिता आवश्यक कागदपत्रांची यादी

| अ. क्र. | प्रमाणपत्र / कागदपत्रांचा तपशील |
|---|---|
| (१) | **(अ) महाराष्ट्र राज्यातील सक्षम प्राधिका-याने दिलेले अधिवास प्रमाणपत्र किंवा जन्म ठिकाणाचा उल्लेख असलेले, महाविद्यालय / शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र किंवा सक्षम प्रधिका-याकडील जन्म दाखला.** |
| | **(ब) इतर राज्यातील उमेदवारांना सक्षम प्राधिका-याने दिलेले अधिवास प्रमाणपत्र / रहिवाशी दाखला / रहिवास व जन्मदाखला.** |
| (२) | MHT-CET / JEE / NEET / AIEEA-UG सामायिक प्रवेश परीक्षेचे गुणपत्रक |
| (३) | **उच्च माध्यमिक शालान्त परीक्षेचे प्रमाणपत्र** (एच्एस्एस्सी- इ.१२ वी- विज्ञान) **गुणपत्रक** किंवा गुणविवरणपत्र. |
| (४) | माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षेचे (एसएस्सी- इ.१० वी) गुणपत्रक किंवा गुणविवरणपत्र. |
| (५) | (अ) **महाविद्यालय सोडल्याचे / महाविद्यालय बदलीचे प्रमाणपत्र** (शेवटी शिकत असलेल्या) किंवा जेथे प्रवेश अगोदर मिळालेला आहे त्या महाविद्यालयाचे **बोनाफाईड** प्रमाणपत्र. |
| | (ब) मागील शैक्षणिक वर्षात राज्यातील कृषी विद्यापीठांतर्गत पदवी शिक्षण घेत असलेल्या उमेदवारांसंदर्भात, चालू शैक्षणिक वर्षासाठी पहिल्या वर्षात प्रवेश घेण्याकरिता चालू शैक्षणिक वर्षापूर्वी प्रवेश घेतलेल्या **संबंधित महाविद्यालयाचे बोनाफाईड प्रमाणपत्र.** |
| (६) | मा.सर्वोच्च न्यायालयाने सिव्हील अपील क्र. ११२३४-४८/२०१७ बाबत दिलेल्या निकालास अनुसरून अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), इतर मागासवर्ग आणि विशेष मागासप्रवर्ग या उमेदवारांचे **जात वैधता प्रमाणपत्र.** |
| (७) | दि. **१ एप्रिल,२०१८ किंवा त्यानंतर दिलेले किंवा अर्ज ज्या दिनांकास दाखल केला असेल, त्या दिनांकास ग्राह्य असलेले** उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र. |
| (८) | (अ) मा.पंतप्रधान / मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांची स्वाक्षरी असलेले अर्जदाराच्या माता / पिता / आजी / आजोबा यांचे **'स्वातंत्र्य सैनिक असल्याबाबतचे प्रमाणपत्र'.** |
| | (ब) **स्वातंत्र्य सैनिकाचे आणि जर स्वातंत्र्य सैनिक हयात नसल्यास स्वातंत्र्य सैनिकाच्या पती/पत्नीचे रु.१००/- च्या मुद्रांकावरील प्रतिज्ञापत्र.** |
| | (क) असल्यास, खालील बाबी नमूद करण्यात आलेल्या आहेत काय? |
| | (१) उमेदवार हा स्वातंत्र्यसैनिकाचा मुलगा / मुलगी किंवा त्यांच्या मुलाचा / मुलीचा मुलगा/ मुलगी आहे. |
| | (२) स्वातंत्र्य सैनिकाने यापूर्वी कोणत्याही नातेवाईकासाठी ही सवलत घेतलेली नाही. |
| | (३) यावेळी लाभ मिळाल्यास, यानंतर स्वातंत्र्य सैनिक कोणत्याही अन्य नातेवाईकासाठी ही सवलत घेणार नाही. |
| (९) | **संरक्षण दलातील कर्मचारी** असल्याबाबतचे जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांचे प्रमाणपत्र किंवा रेजिमेंटच्या समादेशक अधिका-याचे **प्रमाणपत्र** किंवा सक्षम प्राधिका-याचे 'सैनिक' असल्याबाबतचे प्रमाणपत्र. |
| (१०) | सक्षम जिल्हा शल्य चिकित्सक किंवा समतुल्य शासकीय रूग्णालय / वैद्यकीय मंडळाचे **'शारीरिक अपंगत्वाचे प्रमाणपत्र.'** [**विकलांगतेची टक्केवारी** शारिरीकदृष्टया अपंग प्रवर्गाकरिता आरक्षण मागणा-या विद्यार्थ्याच्या बाबतीत, **४० टक्क्यांपेक्षा कमी असता कामा नये.**] |

| अ. क्र. | प्रमाणपत्र / कागदपत्रांचा तपशील |
|---|---|
| (११) | लाभार्थ्यांच्या नावे असणारी, विद्यार्थ्याच्या / विद्यार्थीनीच्या माता पित्याची अथवा आजोबा-आजीची जमीन कृषी विद्यापीठ / पाटबंधारे / वीज / संरक्षण प्रकल्प यासाठी शासनाने संपादित केली असल्याचे विहित नमुन्यातील महाराष्ट्र शासनाच्या जिल्हा पुनर्वसन अधिका-याने / किंवा शासनाने प्राधिकृत केलेल्या अधिका-याने (प्राधिकृत केले असल्यास प्राधिकृत करण्यात आले असल्याच्या सक्षम अधिका-याच्या पत्रासह) **'प्रकल्प विस्थापित व्यक्तीकरिता दिलेले प्रमाणपत्र (पीएपी.)'.** |
| (१२) | उमेदवार किंवा त्याचे माता-पिता किंवा आजा-आजी (पित्याकडून) शेतजमिनीचे मालक किंवा कूळ म्हणून शेतजमीन धारक आहे / आहेत आणि त्यांचे उत्पन्नाचे मुख्य साधन जमिनीच्या वैयक्तिक मशागतीतून आहे हे दर्शविणारे तहसिलदार / नायब तहसिलदारापेक्षा कनिष्ठ दर्जा नसलेल्या अधिका-याचे विहित नमुन्यातील / तहसीलदार किंवा नायब तहसीलदार यांनी दिलेले त्यांच्याकडील उपलब्ध असलेल्या विहित नमुन्यामध्ये सन २०१६-१७ किंवा २०१७-१८ या वर्षातील **'शेतकरी असल्याबाबतचे प्रमाणपत्र (एजी)'.** |
| (१३) | (i) विद्यार्थी / विद्यार्थीनीच्या नावे किंवा माता-पिता / आजोबा-आजीच्या नावे शेतजमीन आहे, हे दर्शविणारा तलाठी / पटवारी याने दिलेला **सन २०१६-१७ किंवा २०१७-१८ वर्षाचा गाव ७/१२ उतारा / खसरा.**<br>(ii) आई / वडील हयात नसल्यास त्याच्या कुटुंब प्रमुख्याच्या नावावरील ७/१२ उतारा व कुटुंब प्रमुखाचे **रु.१००/- च्या मुद्रांकावर प्रतिज्ञापत्र.**<br>**(iii) हा उतारा मराठी/ हिंदी किंवा इंग्रजी भाषेमध्ये नसल्यास, प्रमाणित अनुवादाची प्रत सोबत जोडावी.**<br>(iv) उमेदवाराच्या आईच्या वडिलोपार्जित शेतजमिनीमध्ये तीचा हिस्सा असेल तर आईच्या पित्याचे रु.१००/-च्या (शंभर रूपये फक्त) मुद्रांकावर केलेले शपथपत्र. |
| (१४) | उमेदवाराच्या माता / पित्याचे उपजिविकेचे मुख्य साधन शेतजमिनीवरील शारीरिक श्रमाचे आहे, असा उल्लेख असणारे तहसिलदार / नायब तहसिलदाराचे **'भूमिहीन शेतमजुराचे प्रमाणपत्र'** (असे प्रमाणपत्र अर्जदाराच्या नावे नसावे.) तथापि, **अशा उमेदवारास 'शेतकरी' (एजी) प्रवर्ग लागू असणार नाही.** |
| (१५) | उत्पन्नाचे साधन केवळ मच्छीमारी हाच व्यवसाय आहे, असा उल्लेख असणारे तहसिलदार / नायब तहसिलदार / बंदर अधिकारी यांचे **'मच्छिमार असल्याबाबतचे प्रमाणपत्र'**. |
| (१६) | **राष्ट्रीय छात्रसेने**चे (एनसीसी) **'ब' किंवा 'क' प्रमाणपत्र** किंवा समादेशक अधिका-याचे (वायु /नौसेना / सैन्यदल) (अकरावी किंवा बारावी इयत्तेमध्ये उत्तीर्ण झालेले). |
| (१७) | अर्जदाराने महाविद्यालयात इयत्ता **अकरावी आणि / किंवा बारावी मध्ये आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, राज्य, जिल्हा क्रीडा स्पर्धांमध्ये सहभाग घेतला आहे, असे जिल्हा क्रीडा अधिका-याचे प्रमाणपत्र**. |
| (१८) | कनिष्ठ महाविद्यालयाच्या सक्षम प्राधिका-याचे **'एनएसएस (राष्ट्रीय सेवा योजना) प्रमाणपत्र'**. (किमान २४० तास काम केलेले / विशेष शिबीर केलेले). |
| (१९) | **महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद / कृषी विद्यापीठ यांच्या कर्मचा-यांचा पाल्य असल्याचे प्रमाणपत्र.** |
| (२०) | इ.११ / १२ वी मध्ये जिल्हा, राज्य, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय वादविवाद/ निबंध स्पर्धा/वक्तृत्व स्पर्धांमध्ये प्रतिनिधीत्व करणा-या उमेदवारांनी सादर केलेले जिल्हा क्रीडा अधिकारी यांचे प्रमाणपत्र. |
| (२१) | कृषीविज्ञान किंवा ग्रामीण संस्था, अमरावती किंवा वर्धा येथील **पदविका गुणपत्रक / प्रमाणपत्र.** |
| (२२) | कृषी तंत्र शाळेतील गुणपत्रक / प्रमाणपत्र. |
| (२३) | जम्मू व काश्मीर राज्यातील **स्थलांतरित / विस्थापित विद्यार्थी,** शासन निर्णय क्र.एजीयु-२०९५/ २३१०६/ सीआर-१८१/१९-अे, दि. ५/९/१९९६ मध्ये नमूद केल्याप्रमाणे सक्षम प्राधिका-याचे **प्रमाणपत्र**. विस्थापिता संबंधीचे शपथपत्र विचारात घेतले जाणार नाही. |

| अ. क्र. | प्रमाणपत्र / कागदपत्रांचा तपशील |
|---|---|
| (२४) | सेवेत असलेले उमेदवार असल्यास संबंधित कार्यालय प्रमुखाचे **'ना हरकत प्रमाणपत्र'.** |
| (२५) | स्वच्छताविषयक सुविधांबाबत हमीपत्र. |
| (२६) | संकेतस्थळावर अपलोड केलेल्या मूळ प्रतींच्या सत्यतेबाबत स्वयंघोषणा पत्र. |
| (२७) | महिला व बालविकास विभाग, शासन निर्णय क्र. अमुजा २०११/प्र.क्र.२१२/का-३, दि.२/४/२०१८ अन्वये आयुक्त, महिला व बालविकास, पुणे यांच्या छापील लेटर हेडवरील उपायुक्त (बालविकास), पुणे / आयुक्त, महिला व बालविकास, पुणे यांच्या स्वाक्षरीचे अनाथ प्रमाणपत्र. |
| (२८) | अल्पसंख्यांक उमेदवाराचे धार्मिक / भाषिक प्रमाणपत्र. |